## प्रकाश बाळ जोशी यांचा कलाप्रवास

आपल्या पंचवीस वर्षांतील कलेविषयी एक काळजाला भिडणारा अनुभव सांगतात. तो म्हणजे, छोटू नावाचा पामेलियन कुत्रा माझ्याकडे होता. माझ्या घरातील एक सदस्यच होता तो. तो मला सहा वाजता उठवायचा. तोच मला फिरायला घेऊन जायचा. ते पावसाचे सुरुवातीचे दिवस असतील... त्या दिवशी तो थकल्यासारखा वाटला. एकटक आकाशाकडे पाहात होता. आकाशात चारही बजूला काळे ढग पसरले होते आणि मध्येच बरोबर याची एक प्रतिकृती दिसत होती. मला त्याच क्षणी छोटू त्या ढगात दिसला. हा संकेत होता. त्यानंतर दोन दिवसांनी तो गेला. त्यावेळचं एक पेंटिंग मी काढलं आहे. ते चित्र मला अतिशय प्रियही आहे.

त्यानंतर कवी ग्रेस यांची 'भय इथले संपत नाही' ही कविता, जी एका प्रियकर आणि प्रेयसीची नाही तर प्रत्येकाच्या अंतर्मनात असलेल्या भयावर आहे. एकदा मी या कवितेतील पूर्ण फीलिंग्ज त्या चित्रात उतरवल्या. हे चित्र त्यांना इतकं आवडलं की, 'अंतर्मन' या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर ते आहे. जोशी सर सांगतात, भावना ही चित्राचा गाभा असते. ते काढताना मेहनतीबरोबर शिस्तही हवी. कारण अनेक प्रकारचे विचार तुमच्या मनात असतात. पण त्यापैकी काही विचारच तुम्हाला त्या कोऱ्या कॅनव्हासवर उतरवायचे आहेत. हेच जोशी सरांच्या चित्रांमधून पाहायला मिळतं. स्केचेस, सिंगल लाईन स्केचेस, अमूर्त किंवा ॲबस्ट्रॅक्ट पेंटिंग, आर्ट इन्स्टॉलेशन्स अशा वेगवेगळ्या प्रकारे त्यांच्या कलेच्या क्षेत्रात वाटचाल सुरू आहे. त्यांनी सगळं स्वत:साठी केलं. एक चित्रकार व्हायचं किंवा प्रदर्शन भरवायची असं मनातही नव्हतं. कलेचं शिक्षण-प्रशिक्षण न घेताही कलेत रममाण होत गेले. जोशी सरांना भेटल्यानंतर एक मात्र निश्चित सांगावंसं वाटतं, चेहऱ्यावर आकर्षक तेज, बोलण्यात माधुर्य, चेहऱ्यावर अहंपणाचा लवलेशही नाही. ते आपल्या कलेबद्दल इतकं सरळ आणि सहज बोलतात की, अरे... इतकं सोपं असतं सगळं. एक प्रकारची होकारार्थी लहर समोरच्यामध्ये उत्पन्न होते यात शंकाच नोही. एक ध्येय आणि ते पूर्ण करण्याचं वेड असेल तर कळत-नकळत सारं काही घडत जातंच, हेच जोशी सरांना भेटल्यानंतर म्हणावंसं वाटतं.



### प्रकाश बाळ जोशी यांचा कलाप्रवास

- इंडिया आर्ट फेस्टिव्हल २०१६ नेहरू सेंटर, ललित कला अकॅडमी न्यू दिल्ली -२०१६.
- लंडन येथील बेलग्राविया गॅलरी येथे शांती या विषयावर आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेले प्रदर्शन.
- फ्रान्स येथील ब्रेइश्यूअर येथे दोन महिने चाललेले प्रदर्शन.
- साऊथ कोरिया एशियामेनिया आर्ट इव्हेंट इंडियन पॅव्हियन सीव्हल - २०१६.
- तर उपवन फेस्टिव्हल, ठाणे २०१५, इंडियन आर्ट फेस्टिव्हल २०१४ ऑईल ॲन्ड कॅनव्हास आर्ट.
- शिकागो यूएसए ग्रुप - अरटेरिया फाइन आर्ट.
- ब्रश स्ट्रोक आर्ट गॅलरी, पुणे.
- भूतान येथील थिम्फू, तर तुर्की येथील इजमीर.
- कालाघोडा आर्ट फेस्टिव्हल, तर इंडियन आर्ट फेस्टिव्हल-२०१२.
- युरोपमधील सर्वात मोठा फेस्टिव्हल जे स्वित्झर्लंडमधील आर्ट बेसल येथे २०१२ मध्ये पार पडले.

सुरू झाला. म्हणजे कुठलीही गोष्टी मनात न ठेवता, ज्याला संकल्पना चित्र म्हणतात, याला तुम्ही आकार म्हणता, अशी अमूर्त शैली. जी वापरून आपल्या मनात ज्या भावना आहेत, त्या व्यक्त करण्याचा मी प्रयत्न करतो. गेली अनेक वर्षं माझे हे काम चालू आहे. खरं सांगायचं तर जेव्हा कोऱ्या कॅनव्हाससमोर मी उभा राहतो, तेव्हा माझ्या मनात कुठली संकल्पना नसते. त्यावेळी अंतर्मनात ज्या काही संवेदना असतात, जी काही तयारी केलेली असते ती उस्फूर्तपणे त्या कॅनव्हासवर उतरते. चित्रकलेचा असा एक विषय डोक्यात नसतो.''

जोशी सरांच्या चित्रांमध्ये निसर्गाच्या विविध छटा दिसतात. पाण्याचं वास्तव रूप त्यांच्या चित्रांमधलं देखणेपण आहे. याचं कारण ते सांगतात, ''नद्यांविषयी मला आकर्षण आहे. नदीची ओढ आहे. ठाण्यातील सूर्या धरणाजवळ असलेली नदी. पाच-सहा वर्षांचा असताना मी बुडालो होतो. श्वास कोंडला होता. मृत्यूचं दर्शन झालं होतं मला. वर पाहिलं सगळा काळोख, किंचितसा प्रकाश होता. त्या प्रकाशाकडे पाहताच मला एक अनुभूती आली. पण मनात भयही होतं. वडील म्हणाले, 'तुला पोहता येत नव्हतं म्हणून तू बुडालास, पोहता आलं असतं तर बुडाला नसतास.' त्यांनी मला पोहायला शिकवलं. त्यानंतर नद्यांबद्दल आकर्षण निर्माण झालं. ते इतकं की, आपल्या देशातून नाहीशी झालेली सरस्वती नदी. मी या नदीचा शोध घेतोय माझ्या कलेतून. जिथे कुठे